**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

संलग्नता/जाहिरात/२०२३–२४/323 एप्रिल २९, २०२३

**<u>परीपत्रक :</u>**

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयाचे संस्थाप्रमुख/ प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य यांच्या माहीतीस्तव व उचीत कार्यवाहीकरीता...

**विषय: शिक्षकीय पदांच्या नियुक्तीपूर्वी विद्यापीठाकडून जाहिरात मंजूरी घेणेबाबत..**

**संदर्भ : परीपत्रक क्र.**

1. **Affi.Gen.1/circular/17/18/426 dated 15.06.2017.**
2. **Affi/Adv. Circular/2021-22/377 dated 22 June, 2021**
3. **संलग्नता/जाहिरात/२०२३–२४/३२९, दिनांक २० एप्रिल, २०२२**

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये, शिक्षकीय पदांच्या नियुक्तीपूर्वी विद्यापीठाकडून जाहीरात मंजूरी घेणेबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत, परंतू काही महाविद्यालये निर्देशित सुचनांचे पालन करताना आढळून येत नाहीत, असे विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे.

तरी, प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य यांस पुन:श्च एकदा या परीपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करीता शिक्षकीय पदांच्या नियुक्ती करण्यापूर्वी विद्यापीठाकडून जाहिरात मान्य करुन घेणे बंधनकारक आहे. जाहिरात मान्यतेकरीता खालील कागदपत्रांसह विद्यापीठाच्या संलग्नता विभागाकडे मे १०, २०२३ पूर्वी प्रस्ताव सादर करावा.

१. महाविद्यालयाचे पत्र.
२. सद्य स्थितीतील रिक्त पदांचा आढावा तक्ता (सोबत जोडला आहे).
३. प्रमाणित केलेली बिंदूनामावली (copy of Roaster Approved by concern Regional Joint Director), किंवा अल्पसंख्यांक महाविद्यालय असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

शिक्षक पदांच्या नियुक्तीपश्चात विद्यापीठ मान्यतेकरीता सादर केलेल्या प्रस्तावासोबत विद्यापीठ जाहिरात मान्यतेबाबतचे पत्र सादर न केलेले प्रस्ताव नामंजूर करण्यात येतील, याची नोंद घ्यावी. महाविद्यालय जरी अप्लसंख्यांक वर्गात येत असले तरी जाहिरात मंजूरी घेणे बंधनकारक असेल.

अधिकच्या माहितीकरीता संलग्नता विभाग, दूरध्वनी क्र.:०२२–२२०९१५७७ येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

25/23.

(प्रो. मेधा तापिआवाला)
अधिष्ठाता, मानवताविज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अति.भार)

D:\Pallavi\Affiliation (Pallavi)\CIRCULAR\Marathi Circular.docx